ORIGINAL ARTICLE ISSN:- 2249-894X

Review Of Research

*सारांश :-*

एकोणिसाव्या शतकात समाजप्रबोधन युगाला सुरूवात झाली होती. महात्मा फुले यांनी सामाजिक सुधारणा करीत असताना आपले लेखन चालू ठेवले. त्याद्वारे शेतकऱ्यांची, कष्टकऱ्यांची, शुद्रांची परिस्थिती आपल्या लिखानातून जनतेसमोर आणि सरकार समोर आणली. समाजातील कनिष्ठ वर्गाची धार्मिक आणि सामाजिक गुलामगिरीतून मुक्तता करण्यासाठी महात्मा फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ला सत्यशोधक समाजाची स्थापना केली. महात्मा फुले यांच्या निधनानंतर सत्यशोधक समाजाचा सर्व भार कृष्णराव भालेकर, नारायण लोखंडे, डॉ. विश्राम घोले यांच्यावर येऊन पडली. महात्मा फुले यांच्या नंतर चळवळीचे काम थोडे मंदावले. इ. स. १९११ नंतर सत्यशोधक चळवळीचे केंद्र कोल्हापूर बनले. शाहू महाराजांच्या प्रेरणेतून कोल्हापूरात सत्यशोधक समाजाची पुर्न:स्थापना झालेली होती. शाहू महाराजांनी सत्यशोधक समाजाच्या विकासास सहाय्य केले. त्यांनी मराठा क्षात्रजगद्‌गुरूची स्थापना केली. शाहूचे सत्यशोधक समाजाशी अतूट नाते होते. त्यामुळे महात्मा फुले यांच्यानंतर सत्यशोधक चळवळीचे पाइक राजर्षी शाहू छत्रपती होते.



*जाधव बबन भिवसेन*

संशोधन मार्गदर्शकः टि.म.वि. पुणे , शिक्षणमहर्षी दादासाहेब लिमये महाविद्यालय, कळंबोली, नवी मुंबई,

# सत्यशोधक चळवळीचे पाइक राजर्षी शाहू छत्रपती





## प्रस्तावना :-

***कोल्हापूरात सत्यशोधक समाज :–*** सत्यशोधक समाजाशी शाहू महाराजांचा संबंध केव्हा आला हे इतिहासाला ज्ञात नाही. भास्करराव जाधव यांनी शाहू महाराजांना सत्यशोधक समाजाची माहिती दिली असावी. भास्करराव जाधव यांच्यावर महात्मा फुले यांचा प्रभाव होता. अण्णासाहेब लठ्ठे सारखे सत्यशोधकी कार्यकर्ते शाहू महाराजांच्या संपर्कात होते.

शाहू महाराजांनी आपल्या राज्याभिषेकानंतर ब्राह्मणेतर व्यक्तिंना शासनव्यवस्थेत महत्त्वाची पदे दिली होती. म्हणजेच पहिल्यापासून समता प्रस्थापित करण्यावर त्यांचा भर होता. महात्मा फुले यांच्या मृत्यूनंतर सत्यशोधक समाजाला कोणी वाली उरला नव्हता. सत्यशोधक समाजापासून फुटून निघून सत्यधर्म समाज नावाचा एक गट स्थापन झाला होता. परंतु तो म. फुले यांच्या मुलभूत तत्त्वापासून दूर चालला होता. अशा वेळेस शाहू महाराजांचा आश्रय सत्यशोधक समाजास भेटला.

कोल्हापूरात परशुराम घोसरवाडकर इनामदार यांच्या अध्यक्षतेखाली ११जानेवारी १९११ला 'श्री शाहू सत्यशोधक समाजा'ची स्थापना झाली. त्यावेळी अध्यक्ष म्हणून भास्करराव जाधव तर उपाध्यक्ष म्हणून दिवाणबहादूर लठ्ठे यांची नेमणूक करण्यात आली. सर्वाधिकारी म्हणून रावबहादूर महादेव डोंगरे व सेक्रेटरी म्हणून हरिभाऊ चव्हाण यांच्याकडे जबाबदारी सोपविण्यात आली. हे सर्वजण शाहू महाराजांच्या संस्थानात मोठ्या अधिकारावर होते. शाहूंनी पूर्णवेळ कार्यासाठी विठ्ठल बिराजी डोणे (मास्तर) यांची नेमणूक केली. नंतर पुढील काळात सत्यशोधक समाजाचा विकास जोमाने झाला. सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांनी कामाचा सपाटा लावला. एकट्या कोल्हापूरात १९१२ साली २००, १९१३ साली २६६ तर १९१४ साली २९९ लग्नविधी सत्यशोधक पध्दतीने पार पडले. त्यातून मराठा पुरोहितांना प्रशिक्षण देण्याची प्रथा पुढे आली. भास्करराव जाधवांच्या मार्गदर्शनाखाली जुलै १९१३ मध्ये कोल्हापूरात सत्यशोधक शाळा स्थापन केली. या शाळेतील शिक्षकांना पगार, शाळांच्या इतर सुविधा शाहू महाराजांकडून दिल्या जात असत.

### शाहू छत्रपतींचे सत्यशोधक समाजाला सहाय्य :–

वेदोक्त प्रकरणानंतर शाहू महाराजांनी सत्यशोधक समाजाकडे जास्त लक्ष दिले. त्यासाठी अनेकांना प्रोत्साहन दिले. विठ्ठल बिराजी डोणे (मास्तर), बाबुराव यादव, भास्करराव जाधव यांना सत्यशोधक समाजाच्या विकासासाठी मदत केली. शाहीर लहरी हैदर व त्यांचे शिष्य सत्यशोधक समाजाची भजने म्हणतात म्हणून त्यांनाही आर्थिक मदत केली. १५ ऑगस्ट १९२० च्या एका हुकमान्वये महाराजांनी सत्यशोधक समाजासाठी १५०० रू. मंजूर करून ते भास्करराव जाधवांकडे दिल्याची नोंद आहे. सत्यशोधक चळवळीचे एक प्रमुख कार्यकर्ते आणि देशाचे दुश्मन या ग्रंथाचे जहाल लेखक दिनकरराव जवळकर यांनाही तरूण मराठा, जय भवानी आणि भवानी तलवार ही पत्रके काढण्यास छत्रपतींनी मदत केली होती. महाराजांनी करमणूकप्रधान तमाशा अथवा जलशाचे रूपांतर सत्यशोधक समाजाच्या प्रसारासाठी सत्यशोधकी जलशात केले. त्याचा परिणाम खेड्यातील लोकांवर होऊ लागला. त्यामुळेच प्रबोधनकार ठाकरे यांनी म्हटले होते, ''सत्यशोधक जलशांमुळे गावोगाव भिक्षुकांच्या मध्यस्थीशिवाय साध्या हारांच्या अर्पणावर खेडूतांची लग्ने सर्वत्र साजरी होऊ लागल्यामुळे भिक्षुकवर्गात मोठीच खळबळ उडाली.'' साताऱ्यात सुध्दा सत्यशोधक समाजास महाराजांनी मदत केली होती.

शाहू महाराजांच्या दृष्टीकोनातून महात्मा फुले यांनी ब्राह्मणांचा कावेबाजपणा ओळखला होता. म्हणून शाहूंनी नवसरी येथील आर्य धर्म परिषदेच्या आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हटले होते, ''खरा धर्मविद्येचा व धर्माचा प्रवेश या दक्षिण भूमीत व्हावयास पाहिजे असेल तर सत्यशोधक समाजासारख्यांनी ही भूमी त्या कामास योग्य अशी तयार केली पाहिजे. अशा रीतीने जमिनीतील तण व खडक फोडून काढिले म्हणजे आर्य धर्माचे बीज चांगले रूजेल व वृध्दी पावून सर्वास सुख होईल'' . यामधून शाहूंचा सत्यशोधक समाजाविषयी दृष्टीकोन दिसून येतो.

२० ऑगस्ट १९२० रोजी रायबागहून शाहू छत्रपतींनी ॲडम नावाच्या इंग्रजी अधिकाऱ्याला जे पत्र लिहिले होते त्या पत्रात आपणास सत्यशोधक समाजाची तत्त्वे मान्य असल्याचे ते सांगतात. फक्त समाजाचे जलसे ज्याप्रकारे चालतात तो प्रकार आपणास मान्य नाही असे ते म्हणतात.

### छत्रपती शाहू आणि क्षात्रजगद्गुरूपीठ :–

कोल्हापूरातील बाबुराव यादव यांनी आपल्या घरी मराठा पुरोहिताकडून वेदोक्त पध्दतीने २१ ऑगस्ट १९१२ रोजी पहिली श्रावणी घडवून आणली. जून १९२० मध्ये महाराजांनी राजवाड्यातील देवदेवतांच्या व पूर्वजांच्या समाधीच्या पूजा ब्राह्मण पुरोहिताऐवजी मराठा पुरोहिताकडून करण्याचा हुकूम दिला. मराठा समाजातील सुमारे १५० लोकांनी एकत्र येऊन एका जाहीर पूजेचा विधी केला. छत्रपती शाहूंनी १२ ऑक्टोबर १९२० रोजी गारगोटीजवळील पाटगाव येथील मौनी महाराज यांच्या गादीवर सदाशिवराव लक्ष्मण पाटील बेनाडीकर या संस्कृत व तत्त्वज्ञान विषयाच्या विद्यार्थ्याची क्षात्रजगद्गुरू म्हणून नेमणूक केली. हे पाटील सत्यशोधकी विचारांचे होते. अशी खंडेराव बागल यांची नोंद आहे.

महात्मा फुले यांनी देव आणि मानव यांच्यामधील भटजी दलाल काढून टाकण्यासाठी सत्य शोधक समाजाची स्थापना केली. परंतु शाहू छत्रपतींनी मराठा क्षात्रजगद्गुरूची स्थापना करून महात्मा फुले यांचा पुरोहितवर्ग वर्चस्वाविरूध्द्चा लढा संपुष्टात आणून त्यांचा सत्यशोधकी विचार मारून टाकला. अशी टीका शाहूंवर केली जाते.

महात्मा फुले यांची सार्वजनिक सत्यधर्माची संकल्पना समता आणि स्वातंत्र्य या दोन तत्त्वांवर आधारित व्यापक अशा प्रकारच्या मानवतावादाची अपेक्षा करणारी होती. मध्यस्थांचे उच्चाटन करताना म. फुले यांनी प्रस्थापित धर्माचे स्वरूप एकदम नष्ट करण्याचा आग्रह धरला नव्हता. म्हणूनच त्यांनी ईश्वराचे अस्तित्व मान्य करून ईश्वराला निर्मिक हा शब्द वापरला होता. विवाह, वास्तुशांती व दशपिंड हे विधी सत्यशोधकी पध्द्तीने कसे करावयाचे याची संहिता हेतूपूर्वक तयार केलेली होती.

सत्यशोधक समाजाच्या पहिल्या अहवालात ब्राह्मण, भट, उपाध्ये आणि ब्राह्मणी बनावट कार्यसाधक मतलबी ग्रंथापासून शूद्र लोकांची मुक्तता करण्यासाठी हा समाज स्थापन करण्यात आला आहे. असा हेतू स्पष्ट करण्यात आला होता. पुरोहित वर्ग एकदम नष्ट करणे शक्य नसल्याने शुद्र लोकांनी आपल्या जातीचे उपाध्ये निर्माण करावेत असा स्पष्ट उपदेश करीत होते.

प्रचलित समाजव्यवस्थेत जुन्या संस्थाविरूध्द् जेव्हा एखादा समाजसुधारक संघर्षाची भूमिका घेतो तेव्हा ती संस्था एकदम नष्ट करणे शक्य नसते. कारण सामान्य लोकांची तशी मानसिकता झालेली नसते. त्यामुळेच सार्वजनिक सत्यधर्म या पुस्तकात महात्मा फुले यांनी समन्वयवादी भूमिका घेतलेली आहे. त्याचप्रमाणे शाहू छत्रपतींची भूमिका होती. वेदोक्त प्रकरणातील त्यांचा अपमान करणाऱ्या एका भटजीची अन्यायी वागणूकीची त्यांना कल्पना आली. त्यांनाही देव आणि मानव यांच्यातील दलाल मान्य नव्हता. परंतु बहुजन समाजाची ही मानसिकता झालेली नसल्यामुळे त्यांनी प्रथम क्षात्रजगद्गुरू या पदाची मराठा समाजासाठी वेगळी चूल मांडण्याचा प्रयोग करून पाहिला. त्यांनी करवीर जगद्गुरूंना १९२० ला पाठविलेल्या पत्रात ते सांगतात, ''आपण आपले ध्येय देवासंबंधी दलाल असू नये असे ठेवावे. तसेच इतर स्वामीप्रमाणे आपले ध्येय असू नये. देशसेवा, लोकसेवा असेच ध्येय असावे'' .

थोडक्यात शाहू छत्रपती हे महात्मा फुले यांचा पुरोहित वर्गवर्चस्वाविरूध्द्चा लढा निश्‍चित पुढे चालवित होते. त्यांनाही धार्मिक विधीसाठी कोणत्याही प्रकारच्या मध्यस्थ पुरोहिताची आवश्यकता वाटत नव्हती.

शाहू छत्रपतींनी आपल्या संस्थानात श्री शिवाजी क्षत्रिय वैदिक शाळेची स्थापना केली होती. या शाळेच्या पुढील अहवालावरून छत्रपती शाहूंचा दृष्टीकोन दिसून येतो. लोकांना खरा वैदिक धर्म आणि पुराणे या दोन गोष्टी कशा वेगळ्या असून खरा वैदिक धर्म कोणता आहे हे समजून सांगण्याचे कार्य आमचे विद्यार्थी करतील. परंतु हे करीत असताना आमचे हे विद्यार्थी ब्राह्मणांच्या प्रमाणे आपले वर्चस्व लोकांच्यावर निर्माण करणार नाहीत. तर ते अज्ञानी लोकांना खऱ्या धर्माचे शिक्षण देऊन त्या धर्माची लोकप्रियता वाढवतील''.

थोडक्यात शाहूंनी क्षात्रजगद्गुरू पीठाची निर्मिती करून ब्राह्मण पुरोहित काढून बहुजन पुरोहित आणला. महात्मा फुले यांनी ज्याप्रमाणे ईश्वर संकल्पनेला पूर्ण तिलांजली दिली नाही, म्हणून त्यांना काही प्रमाणात प्रतिगामी ठरविण्यात महाराष्ट्रातील काही पुरोगामी विचारवंत स्वत:ला धन्य मानून घेतात. तसाच काहीसा प्रकार शाहू छत्रपतींच्या क्षात्रजगद्गुरू निर्मितीबाबतही होत असतो. परंतु महाराजांचे विचार फार पुढे होते. महाराजांच्या मते परमेश्वराला पूजा, श्रद्धा किंवा प्रार्थना ही व्यर्थ आहेत.

६ मे १९२२ ला शाहू महाराजांचे निधन झाल्यावर पंचगंगेच्या तीरावर त्यांच्यावर अंत्यसंस्कार 'शिवाजी वैदिक विद्यालयातील मराठा विद्यार्थ्यांकडून करण्यात आले. महाराजांच्या जीवननिष्ठेला शोभेल अशीच ही घटना झाली.

### सत्यशोधक आणि ब्राह्मणेतर चळवळी :

सत्यशोधक चळवळ ही ब्राह्मणेतर चळवळीची जननी आहे. महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळीचे ते आद्य पुरस्कर्ते असून सामाजिक चळवळीला सामाजिक वर्ग विग्रहाचे स्वरूप प्राप्त होण्यास त्यांच्या सत्यशोधक समाजाची विचारसरणी कारण ठरली असे म्हणण्यास हरकत नाही. ब्राह्मणजातीच्या वर्चस्वाविरूध्द् अशा प्रकारची आक्रमणशील चळवळ होणे हे हिंदू समाजातील ब्राह्मणेतर जातीत स्वाभिमान उत्पन्न करण्याच्या दृष्टीने अपरिहार्य होते असे दिसते.

सामाजिक चळवळी या गुंतागुंतीच्या असतात. दिनकरराव जवळकरांनी कैवारी च्या अंकात लिहिले होते की, ''महाराष्ट्रामध्ये ब्राह्मणेतर चळवळ हा धार्मिक स्वातंत्र्याकरिता झगडणाऱ्या सत्यशोधक चळवळीचा परिणाम आहे... महाराष्ट्रात सत्यशोधक चळवळ सुरू झाली ती ब्राह्मणेतरांच्यात जातिवंत स्वाभिमान जागृत करण्याकरिताच''.

सत्यशोधक दीनमित्रकार मुकुंदराव पाटील यांनी अध्यक्ष या नात्याने सत्यशोधक समाजाच्या १४ व्या परिषदेत जे भाषण केले होते त्यामध्ये शाहू छत्रपतींचा सत्यशोधक समाजाला कसा पाठिंबा होता, त्याचप्रमाणे त्यांच्या मृत्यूनंतर चळवळ कशी दुबळी झाली हे स्पष्ट केले होते.

### *सत्यशोधक व आर्य समाज :*

शाहू महाराजांचा आर्य समाजाला पाठिंबा होता तरी त्यांचा जास्त कल सत्यशोधक समाजाकडेच होता. आपल्या संस्थानातील शिक्षणसंस्था त्यांनी आर्य समाजाकडे सुपूर्द केल्या कारण राजाराम कॉलेजा सारख्या कॉलेजाच्या प्रशासनासाठी आर्य समाज त्यांना योग्य वाटला. त्याप्रमाणेच सत्यशोधक समाजाला प्रोत्साहन, विचारांचा प्रसार करण्यासाठी आर्थिक सहाय्य शाहू महाराजांनी केलेले दिसून येते.

धनंजय कीर यांच्या मते, ''आर्य समाजाच्या मतप्रणालीशी तुलना करता सत्यशोधक समाजाची विचारसरणी ही अधिक उदार, सहिष्णू आणि बुध्दिवादी होती. तर आर्य समाजाची मतप्रणाली ही काहीशी संकुचित पण आक्रमक होती.''

महात्मा फुले यांच्याप्रमाणेच शाहू छत्रपतींनी बहुजन समाजाच्या विकासासाठी कार्य केले. शिवछत्रपतींचे कार्य हे उभयतांचे प्रमुख आदरस्थान होते. दोघांनीही बहुजनांच्या प्राथमिक शिक्षणाचा सक्तीचा आग्रह धरला व त्यासाठी कार्य केले. हिंदू समाजाच्या मागास रूढींवर टीका केली. अस्पृश्यता आणि जातीय विषमतेला मूठमाती देण्यासाठी उभयतांनी आयुष्यभर अटीतटीचा संघर्ष केला. महात्मा फुले यांच्या 'सरकारने पाटीलकीसहित कुलकर्ण्यांच्या कामाची परीक्षा घेऊन ते काम एकाच जातीकडे सोपवू नये' या मताप्रमाणे शाहू महाराजांनी कुलकर्णी वतन नष्ट करणारा वटहुकूम २५ जून १९१८ला काढून प्रत्यक्ष कार्यवाहीत आणला. शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण घेता यावे यासाठी वसतीगृहांची सोय करण्यात आली. शाहू महाराजांनी कोल्हापूरात भिन्नभिन्न जातींसाठी २३ वसतीगृहे बांधली. महात्मा फुले यांनीही राखीव जागांसाठी अप्रत्यक्ष सूचना केली होती. ब्राह्मणांना त्यांच्या संख्येच्या प्रमाणात नोकऱ्या द्या असाही विचार मांडला होता. तर हा विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी शाहू महाराजांनी १९०२ मध्ये ५०टक्के राखीव जागा मागासलेल्या जातींसाठी ठेवण्याचा आदेश काढला. महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न केले होते. राजर्षी शाहू महाराजांनी १९१९च्या भाषणात शेती आणि शेतकरी यासंबंधीचा आपला दृष्टीकोन पुढील शब्दांत स्पष्ट केला होता, ज्या कृषिकर्मावर सारी मनुष्यजात उपजीविका करते ते कृषिकर्म हलके अथवा वाईट असे मी मुळीच मानीत नाही.

थोडक्यात शाहू महाराजांचे जीवन आणि कार्य यांचा मागोवा घेतला की, त्यांनी महात्मा फुले यांच्या बहुजन उध्दाराची कार्यपरंपरा समर्थपणे पुढे नेली हे मान्य करावे लागते.

### *शाहूचे सत्यशोधक समाजाशी अतूट नाते :*

सत्यशोधक समाज आणि राजर्षी शाहू यांचे अतूट नाते होते. शाहूंच्या निधनानंतर त्याच वर्षीच्या ऑगस्ट महिन्यात कोल्हापूर सत्यशोधक समाजामार्फत जे मानपत्र राजाराम महाराजांना बहाल करण्यात आले होते त्यामध्ये शाहूच्या अकस्मात आणि अकाली निधनाने सत्यशोधक समाजाचे अपरिमित नुकसान झाले आहे असे नमूद करण्यात आले होते. राजाराम महाराजांनी आपल्या वडिलांच्या प्रमाणे सत्यशोधक समाजाच्या कार्याला संपूर्ण पाठिंबा दिला होता.

शाहूच्या मृत्यूनंतर भगवंतराव पाळेकर यांनी आपल्या जागृती या पत्रकात लिहिले की, सत्यशोधक समाजाच्या चळवळीचा उजवा हात गळून पडला आणि अस्पृश्य मानलेल्या वर्गातील लोकांच्या मस्तकावरील प्रेमाचे व औदार्याचे छत्र मोडून पडले आहे.''

शाहूच्या मृत्यूनंतर सत्यशोधक समाजामार्फत किंवा इतर संस्थाच्या मार्फत महात्मा फुले आणि राजर्षी शाहू यांच्या पूण्यतिथी समारंभात जी भाषणे होत त्या भाषणांमध्ये महात्मा फुले यांचे कार्य शाहूंनी कसे पुढे चालविले याचे अनेक उल्लेख विजयी मराठा, ब्राह्मणेतर इ. पत्रकात सापडतात.

महात्मा फुले यांच्या पंढरीनाथ पाटील यांनी लिहिलेल्या चरित्राच्या प्रस्तावनेत नारायण गणपतराव अमृतकर लिहितात, ''शाहू महाराजांनी जोतिरावांच्या तत्त्वांचा पुरस्कार केल्यामुळे महाराष्ट्रामध्ये सत्यशोधक समाजाचा हा हां म्हणता प्रसार होऊन तो ब्राह्मणांची खुद्द पाळेमुळे खणून काढण्याइतका खंबीर बनू लागला.''

श्री शाहू सत्यशोधक समाज कोल्हापूर या संस्थेमार्फत महात्मा गांधीना जे मानपत्र इ. स. १९२७ मध्ये देण्यात आले त्यामध्ये म्हटले आहे, ''ही समान हक्काची चळवळ अस्पृश्योध्दारक कै. राजर्षी शाहू महाराज यांनी हाती घेतली. करवीर राज्यात मुख्य धंदा शेतीचा. ब्राह्मणेतर वर्ग शेतकरी. या वर्गाची मानसिक गुलामगिरीतून मुक्तता करणे अगत्याचे वाटल्यामुळे महाराजांनी सत्यशोधक चळवळीस प्रोत्साहन दिले.''

राजर्षी शाहू चे एक समकालीन चितळीचे भाऊसाहेब पवार यांनी १९२९ ला शाहूंचे चरित्र प्रकाशित केले. त्यामध्ये ते लिहितात, ''राजर्षी शाहू महाराज हे महात्मा फुले यांच्या सत्यशोधक तत्त्वांचे पूर्ण अभिमानी होते. त्यांना सत्यशोधक समाजाची तत्त्वे मान्य झाली होती. त्यांनी ह्या तत्त्वांचा प्रसार आपल्या संस्थानात जोराने केला''

महात्मा फुल्यांचा सत्यशोधक समाज म्हणजे केवळ देव आणि मानव यांच्यामधील मध्यस्थ, भट—भटजी ही संस्था नष्ट करण्याची चळवळ नव्हती, तर ती चळवळ सनातनी हिंदू धर्म आणि त्या कालबाह्य धर्माच्या आधारे पोसली जाणारी जातीय विषमता नष्ट करू पहाणारी बहुजनांच्या उध्दाराची सर्वतलस्पर्शी अशी चळवळ होती. थोडक्यात महात्मा फुले यांची सत्यशोधक चळवळ राजर्षी शाहूंच्या कणखर नेतृत्वामुळे महाराष्ट्रात सर्वत्र वेगाने पसरली.

### *सत्यशोधक समाजाचे कोल्हापूरातील कार्य :—*

कोल्हापूरमधील बाबूराव यादव यांनी आपल्या घरी मराठा पुरोहिताकडून वेदोक्त पध्दतीने २१ऑगस्ट १९१२ रोजी कोल्हापूरात पहिली श्रावणी केली. अनेक मराठा लोकांनी एकत्र येऊन जाहीर पूजेचा विधी केला. ब्राह्मण पुरोहिताच्या मक्तेदारीतून बहूजन समाजाच्या मनाची मुक्तता होवो अशी जाहीर प्रार्थनाही करण्यात आली. २४ सप्टेंबरला सत्यशोधक समाजाचा वर्धापनदिन जाहीर सभा भरवून आनंदाने साजरा करण्यात आला. ब्राह्मण

पुरोहिताशिवाय लग्न लावण्यात येऊ लागली. एकट्या कोल्हापूरात १९१२मध्ये २००, १९१३मध्ये २६६ ती १९१४ मध्ये २९९ लग्नविधी सत्यशोधक पध्द्तीने लावण्यात आले. भास्करराव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली जुलै १९१३ मध्ये सत्यशोधक शाळा स्थापन केली गेली. विठ्ठलराव डोणे यांच्याशिवाय हरिभाऊ चव्हाण व श्रीपतराव शिंदे हे या शाळेत शिकवत होते. ही शाळा महाराजांच्या आश्रयावरच चालली होती. शाळेचा अभ्यासक्रम भास्करराव जाधवांच्या मार्गदर्शनाखाली तयार झाला होता तर घरचा पुरोहित यांसारखे ग्रंथ त्यासाठी तयार करण्यात आले होते. मामासाहेब खानविलकराच्या अध्यक्षतेखाली ६ जुलै १९२० रोजी 'शिवाजी क्षत्रिय वैदिक पाठशाळा' या नावाची वैदिक शिक्षण देणारी शाळा काढण्यात आली.

अशा प्रकारे शाहू महाराजांच्या प्रेरणेने व सहाय्याने सत्यशोधक समाजाचे खरे पुनरूज्जीवन होऊन कोल्हापूर संस्थानातच नव्हे तर संस्थानच्या बाहेरही सत्यशोधक चळवळ फोफावत गेली. परिणामी सत्यशोधक चळवळीचे कार्यकर्ते महाराजांना प्रेरणास्थानी मानू लागले. त्यामुळे महात्मा फुले यांच्यानंतर सत्यशोधक चळवळीचे पाइक राजर्षी शाहू छत्रपती होते.

### *संदर्भ व तळटीपा :*


१ .लठ्ठे आ. बा., श्रीमच्छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र, बेळगांव, १९२५, पृ. ३३५—३३७,
— डॉ. जयसिंगराव पवार (संपा.), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, द्वितीयावृत्ती २००७, पृ. १४१
२ .भास्कर धाटावकर (संपा.), राजर्षी शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग — २, मुंबई, १९८९, पृ. ९८.
३ .पी. बी. साळुंखे (संपा.), राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, मुंबई, १९७६, पृ. १४५.
४ .एस. एस. भोसले (संपा.), क्रांतिसूक्त राजर्षी छत्रपती शाहू, १९७५, पृ. ६१—६३.
५ .राजर्षी शाहूंचे अॅडम यांना पत्र, २०/८/१९२०, कोल्हापूर पूराभिलेखागार.
६ . डॉ. जयसिंगराव पवार (संपा.), पूर्वोक्त, पृ. १४३.
७ .येडेकर शाम (संपा.), राजर्षी एक व्यक्तिदर्शन, पृ. ६५.
— डॉ. जयसिंगराव पवार (संपा.), पूर्वोक्त, पृ. ४३६.
८ .धनंजय कीर, राजर्षी शाहू छत्रपति — एक समाजक्रांतीकारक राजा, मुंबई, १९७९, पृ. ५२५. स्मारक
९ .जाधव बबन भिवसेन, महात्मा फुले यांचे शेतकरी व शेतीविषयक विचार, भीमथडी, ग. का. माने (संपा.) अध्यक्ष अखिल महाराष्ट्र इतिहास परिषद, बारामती, २००६, पृ. १३३—१३५.
१० .जाधव बबन भिवसेन, राजर्षी शाहू महाराजांचे शेती विकासाविषयी कार्य — एक अभ्यास, अशोक याक्कलदेवी (संपा.) गोल्डन रिसर्च थॉटस्, व्हाल्यूम — १, इश्यू — ३, सप्टेंबर २०११, पृ. १.
११ .भ. ब. पाळेकर, जागृतीकार पाळेकर, १९६१, पृ. १६०.
१२ .पंढरीनाथ पाटील, म. जातिराव फुले, १९२७, नारायणराव गणपतराव अमृतकर यांची प्रस्तावना.
१३ .रमेश जाधव, राजर्षी शाहू छत्रपती : वाद आणि वास्तव, कोल्हापूर, १९९२, पृ. ११०—१११.
१४ .भाऊसाहेब पवार, राजर्षी शाहू महाराज, १९२९, पृ. ४१.
१५ .लठ्ठे आ. बा., पूर्वोक्त, पृ. ३३५—३३७.
१६ .डॉ. जयसिंगराव पवार (संपा.), पूर्वोक्त, पृ. १४१.
१७ .लठ्ठे आ. बा., पूर्वोक्त, पृ. ४३४.